# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.03.2026** **वारः सोमवार**

---

1. पश्चिम आशियातल्या बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली उच्चस्तरीय बैठक
2. राज्यात हॉटेल्स, उपाहारगृहांसाठी आजपासून आणखी 20 टक्के गॅस पुरवठा होणार
3. निसर्गोपचार आश्रमाने शारीरिक मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचं योगदान दिल्याचे उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचे गौरवोद्गार
4. यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांना जाहीर आणि
5. हर्षवर्धन सदगीर 68 व्या महाराष्ट्र केसरी कुस्तीचा मानकरी

**<u>पंतप्रधान</u>**

पश्चिम आशियातील तणावाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल उच्चस्तरीय बैठक घेतली. यामध्ये देशातील पेट्रोलियम, कच्चं तेल, वायू, वीज आणि खतांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. देशभरात या सर्व अत्यावश्यक वस्तूंचा अखंडित पुरवठा, त्यासाठीची वाहतूक व्यवस्था आणि वितरण सुनिश्चित करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर, यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री या बैठकीला उपस्थित होते.

**<u>मंत्रालय</u>**

देशभरात अत्यावश्यक इंधनांचा तुटवडा नसल्याचा पुनरुच्चार केंद्र सरकारने केला आहे. देशातील तेल शुद्धीकरण प्रकल्प उच्च क्षमतेने कार्यरत असून, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. किरकोळ विक्री केंद्रांवरही इंधनाची कमतरता नाही, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. राज्यांना व्यावसायिक एलपीजीचा अतिरिक्त पुरवठा करण्यात आला असून, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालयांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य दिलं जात असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>गॅस पुरवठा</u>**

राज्यातील हॉटेल, उपाहारगृहांसाठी आता 20 टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा केला जाणार असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपाहारगृहे, औद्योगिक उपाहारगृह, अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय, राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स यांच्यासाठी 20 टक्के एलपीजी पुरवठा करण्याचे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत, असं छगन भुजबळ यांनी काल सांगितलं.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

निसर्गोपचार, निसर्गाशी साहचर्य राखणाऱ्या जीवनशैलीला प्रोत्साहन देत असल्याचं, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्याजवळच्या उरुळी कांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या 81व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते काल बोलत होते. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने शारीरिक मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचं योगदान दिलं असं उपराष्ट्रपती म्हणाले. 'विकसित भारता'च्या दिशेने वाटचाल करताना सुदृढ भारतही अत्यंत आवश्यक असल्याचं ते म्हणाले. उपमुखमंत्री सुनेत्रा पवार यावेळी आपल्या भाषणात म्हणाल्या....

**निसर्ग आणि महात्मा गांधी यांचं अतूट नातं होतं ग्रामीण भागाचा विकास हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. समाज प्रबोधन आरोग्याने निसर्गोपचारावर त्यांनी भर दिला निसर्गाच्या सानिध्यामध्ये प्रत्येक आजार बरा करण्याची ताकद असते हा गांधीजींचा संदेश आजही मार्गदर्शक ठरलेला आहे. या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी उळीकांचन निसर्गोपचार आश्रम येथे पाहायला मिळते.**

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्वाधिक काळ सरकारप्रमुख म्हणून 8 हजार 931 दिवसांचा प्रदीर्घ सार्वजनिक सेवाकाळ पूर्ण करत नवा इतिहास घडवला आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशातील सर्व नागरिकांचं आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताने विविध क्षेत्रांमध्ये प्रगतीचे नवे मापदंड निर्माण केले आहेत, त्यांचं नेतृत्व आणि दृष्टिकोन देशाला अधिक सक्षम, आत्मनिर्भर आणि प्रगत भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>शाळा प्रवेशोत्सव</u>**

जिल्हा परिषद आणि शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी 'गुढीपाडवा-पट वाढवा' हे अभियान लोकचळवळ बनवून प्रत्येक गावात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करावा, असं मत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केले. पुणे  जिल्ह्यातल्या दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा गरदरेवाडी वडगाव बांडे इथं आयोजित 'गुढीपाडवा-पट वाढवा' राज्यस्तरीय अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**<u>पुण्यभूषण</u>**

पुण्यभूषण फौंडेशनतर्फे दिला जाणारा मानाचा पुण्यभूषण पुरस्कार यंदा जेष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती, पुण्यनगरीच्या ग्रामदैवतांची प्रतिमा असलेलं स्मृतिचिन्ह आणि दोन लाख रूपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. सीमेवर लढताना जखमी झालेल्या जवानांना आणि वीरमातेलाही पुण्यभूषण फौंडेशनतर्फे गौरविण्यात येणार असल्याचं संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी काल प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं.

**<u>जलदिन</u>**

पाणी व्यवस्थापन ही केवळ तांत्रिक बाब नसून ती सामाजिक, आर्थिक आणि नैतिक जबाबदारी आहे. असं मत ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर पोपटराव पवार यांनी व्यक्त केलं. ते काल पुण्यातल्या कृषि महाविद्यालयात जागतिक जल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. महात्मा गांधी यांनी दिलेला 'खेड्याकडे चला' हा संदेश आपण विसरलो आणि त्याचे परिणाम आज नद्यांच्या बदललेल्या प्रवाहात आणि प्रदूषणात स्पष्टपणे दिसत आहेत, असं पवार म्हणाले. यावेळी राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विलास खर्चे, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>खरात गुन्हा-नाशिक</u>**

महिलांच्या लैंगिक छळ प्रकरणात अटकेत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. एका पीडित महिलेनं केलेल्या तक्रारीनंतर याप्रकरणी नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरात याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान खरात प्रकरणी पीडितांना न्याय मिळेपर्यंत सरकार शांत बसणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना दिली. ते म्हणाले....

**खरात यांचं प्रकरण अत्यंत गंभीर आहे ते आम्ही इंटेलिजन्सच्या आधारावर आम्हीच त्याचा भांडाफोड केलेला आहे. आणि आता हळूहळू याची आम्हाला कल्पना होती की लाजेखातर किंवा सामाजिक दबावामुळे महिला एकदम पुढे**

**येत नाहीत, म्हणून अशा प्रकारचे जे काही व्हिक्टिम्स आहेत, त्या व्हिक्टिम्सला धीर देऊन, त्यांच्या घरच्यांना धीर देऊन, त्यांना समोर आणण्याचा प्रयत्न चाललेला आहे. त्याच्यामध्ये काही प्रमाणात आता महिला प्रतिसाद देखील देत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होते आहे. स्वतः डीजींना मी सांगितलेलं आहे, की त्यांनी याचं मॉनिटरिंग करायचं आहे. याच्यामध्ये एसआयटी तयार केलेली आहे. नाशिक सीपी आणि एसआयटी मिळून या ठिकाणी हे काम पूर्ण करत आहेत. आणि मला असं वाटतं की या संदर्भात कुठल्याही परिस्थितीत कोणालाही स्पेअर केलं जाणार नाही. आता याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न चाललेला आहे. कोणाजवळ काही पुरावा असेल तर त्यांनी तो निश्चित आणून द्यावा त्याच्यावरही कारवाई होईल.**

**विद्यार्थी ईस्त्रो सहल-नांदेड**

नांदेड जिल्हा परिषदेच्यावतीनं जिल्ह्यातील 67 विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो इथं शैक्षणिक सहलीसाठी काल पाठविण्यात आलं. मुलांना विज्ञान तंत्रज्ञान याविषयी आवड निर्माण व्हावी, जिल्हा परिषद शाळांचा पट वाढावा, विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळावी अशा हेतूने या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते हिरवी झेंडा दाखवून विद्यार्थ्यांना रवाना करण्यात आलं.

**निधन-वर्धा**

विदर्भाचे लोकनेते अशी ओळख असलेले, सावंगी इथल्या आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठाचे कुलपती, माजी खासदार दत्ता मेघे यांचं काल नागपूर इथं निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज त्यांचं जन्मगाव असलेल्या पवनार इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दत्ता मेघे यांनी राज्य मंत्रीमंडळात राज्यमंत्री या पदावर काम केलं होतं तसंच नागपूर, रामटेक आणि वर्धा इथून ते लोकसभा आणि राज्यसभा सदस्य म्हणूनही कार्यभार सांभाळला आहे.

**कुस्ती**

पुण्यातील वाघोली इथं  पार पडलेल्या 68 व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत नाशिकचा हर्षवर्धन सदगीर याने मानाची चांदीची गदा उंचावत  दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी किताब पटकवण्याचा मान काल मिळवला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीमध्ये अंतिम फेरीत त्याने सोलापूरच्या महेंद्र गायकवाड याच्यावर 4-3 गुणांनी मात करत दुहेरी महाराष्ट्र केसरी किताबाला गवसणी घातली. मानाची चांदीची गदा, पाच लाख रुपये आणि एक गाडी हर्षवर्धनला भेट देण्यात आली. हे दोन्ही मल्ल अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या तालमीत तयार झालेले असून एकाच आखाड्यात सराव करणारे आहेत. त्यामुळे अंतिम लढत अधिकच उत्कंठावर्धक ठरली.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान कोरडं राहिल असा हवामान विभागाचा अंदाज आहे

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.